महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

<u>रजिस्टर पोस्टाने</u>

मुंबई. दि. १०/०१/२०२३

क्र. पोमसं/३६/र.व का. (८३००)/माअअ -खान /१६७/२०२२.

प्रति,
श्री. वहीद गफ्फार खान
प्लॉट नं.२०/ सी /०६, रोड नं.३, शिवाजी नगर
गोवंडी पश्चिम, मुंबई ४०००४३

**संदर्भ :-** आपला दिनांक ३०/११/२०२२ चा अर्ज.

**विषय :-** माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये माहिती मिळण्याबाबत.

******

महोदय,

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत आपण शासनास सादर केलेला दि.३०/११/२०२२ चा अर्ज शासनपत्र, गृहविभाग, क्र.माअअ-२०२२ /सं.क्र.३१५९/आस्था-३, दिनांक २१/१२/२०२२ च्या पत्रासोबत या कार्यालयात नोंदणी शाखेत दिनांक २६.१२.२०२२ रोजी व कार्यासन क्र.३६ मध्ये दिनांक २८.१२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. आपण मागणी केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अर्जातील मुद्दे | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्यात वरिष्ठ पोलीस अधिकारी DySP /ASP /SP कार्यालय येथे अनेक पोलीस अधिकारी साहेबांची केबिनचे दारावर लिखित नोटीस लावलेले आहे, ज्यावर असे नमुद आहे की, 'आपला स्वत:चा मोबाईल फोन बाहेर ठेवून साहेबांच्या केबिन मध्ये प्रवेश करावा'.<br>याबाबत नोटीस व नियम संबंधीत शासन परिपत्रक, वरिष्ठांचे आदेश पत्र किंवा मा. न्यायालयाचे आदेश असल्यास प्रत मिळावी. | स्वत:चा फोन बाहेर ठेवून वरिष्ठांच्या केबिनमध्ये प्रवेश करण्याबाबत शासनाचे आदेश किंवा परिपत्रक, वरिष्ठांचे आदेश अथवा मा. न्यायालयाचे आदेश या कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध नाहीत. |

२. सदर माहितीने आपले समाधान झाले नसेल तर, आपण माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(१) मधील तरतुदींनुसार प्रथम अपिलीय प्राधिकारी, तथा पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र. व का.) महाराष्ट्र राज्य, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१ यांना विहीत मुदतीत प्रथम अपील सादर करु शकता.

आपला विश्वासू,

(विनय राणे)
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कार्यासन क्र.३६ चे पदनिर्देशित
जनमाहिती अधिकारी, तथा वरिष्ठ कार्यालय अधीक्षक,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मुंबई.